# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी नसल्याबाबत**

**(१) ८३८ (२३-१२-२०१४). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास पुरेशा प्रमाणात वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी नसल्याने रुग्णांना उपचार करण्यास मोठया प्रमाणात अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोगय केंद्र, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड येथे आकृतीबंधानुसार वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची एकुण १५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मंजूर असलेल्या २ पदांसह १२ पदे भरलेली आहेत. उपलब्ध अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून रुग्णांना रुग्णसेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्र, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड येथील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, अलिबाग यांच्या स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरोग्य विभागात बाजार भावापेक्षा अधिक भावाने धान्य पुरवणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्याबाबत**

**(२) ७४७६ (०७-०४-२०१५). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आरोग्य विभागाचे मनोरुग्णालय, जिल्हा रुग्णालय तसेच ई.एस.आय.एस. रुग्णालयातील रुग्णाच्या जेवणासाठी खरेदी करण्यात येणारे अन्न-धान्य हे बाजार भावापेक्षा जास्त भावाने खरेदी करण्यात येत असल्याचे माहे, डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, हे अन्न-धान्य पुरवण्याचे कंत्राट मागील ५ वर्षांपासून दिक्षा सामाजिक संस्था आणि गीताई महिला बचत गट या दोनच संस्थांकडे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाप्रकारे बाजार भावापेक्षा अधिक दराने अन्न-धान्य पुरविणाऱ्या संस्था व संबंधित अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यात काय आढळून आले आहे,

(४) त्यामुळे, शासनाने उक्तबाबत कोणती कारवाई केली आहे व कोणत्या स्वरुपाची,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-०७-२०१६) :** (१) अशा आशयाची बातमी वृत्तपत्रात आली आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) या संपूर्ण पुरवठ्याची चौकशी करण्यासाठी आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीने शासनास अहवाल सादर केला असून यासंदर्भात अधिक चौकशी गृह विभागामार्फत करण्यात येत आहे.

---

**राज्यातील आरोग्य विभागात ऑनलाईन काम करणा-या डेटा एंटी ऑपरेटरांना मागील १० महिन्यांपासून पगार देण्यात आला नसल्याबाबत**

**(३) १०५२० (०८-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य विभागात ऑनलाईन काम करणा-या डेटा एंटी ऑपरेटरांना मागील १० महिन्यांपासून पगार देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०१४ पासून सुमारे २ हजार २९८ कर्मचारी आरोग्य विभागात विनावेतन काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांनी पगार मिळणा-या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदान येथे दिनांक २१ जानेवारी, २०१५ पासून धरणे आंदोलन सुरु केले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन यासंदर्भात काय कार्यवाही करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मे.ईगल सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्विसेस या सेवापुरवठादाराने नियुक्त केलेल्या काही अकाऊन्टंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना एप्रिल २०१४ पर्यंत वेतन अदा केले आहे. परंतु मे २०१४ पासून कंपनीने अकाऊन्टंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना वेतन अदा केलेले नाही.

(३) हे खरे आहे.

(४) अखिल भारतीय एडीईओ संघटना परिसंघ व मे. ईगल सिक्युरिटी अँण्ड पर्सनल सर्विसेस, मुंबई यांच्या अधिकाऱ्यांसोबत दि.३१.१.२०१५ रोजी आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत मिळालेल्या हजेरीपत्रकामध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी असल्याचे सेवा पूरवठादारांनी नमूद केले. त्यामुळे जिल्हास्तरावर समिती गठीत करुन सर्व हजेरीपत्रकांची पडताळणी करुन सुधारीत हजेरीपत्रक लवकरात लवकर राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्षाकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जिल्हास्तरावर समिती गठीत करुन माहे फेब्रुवारी, २०१४ ते जानेवारी, २०१५ ची हजेरी पडताळणी करण्यात आली. सुधारीत हजेरीपत्रकांनुसार सेवपूरवठादारस अदा करावयाच्या देयकापेक्षा दंडाची रक्कम जास्त असल्याचे दिसून आले.

दरम्यानच्या काळात सदर सेवापूरवठादारने निविदेतील काही अटी व शर्तीचा भंग केल्यामूळे त्यांना दि. १ ऑक्टोंबर, २०१४ पासून त्यांचा करार रद्द करण्यात येत असल्याबाबत तसेच त्यांची सुरक्षा ठेव जप्त करण्याबाबत कळविण्यात आले. यावर सेवापुरवठादाराने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आबीट्रेशन याचिका दाखल केली. सदर याचिकेस अनुसरुन मा.उच्च न्यायालयाने सेवपूरवठादाराविरुध्द करण्यात येणाऱ्या सदर कार्यवाहीस स्थगिती दिली आहे. सदर याचिके संदर्भातील कार्यवाही मा. उच्च न्यायालयामध्ये प्रगतीपथावर आहे.

---

## वन विभागाचे मुख्य कार्यालय चंद्रपूर येथे करण्याची मागणी

**(४) १२३६३ (०८-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वात जास्त जंगल परिसर विदर्भात म्हणजेच ताडोबा, चिखलदरा, मेळघाट येथे असूनही वन विभागाचे मुख्य कार्यालय पुणे येथे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे कार्यालय चंद्रपूर येथे करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) हे वन विभागचे मुख्य कार्यालय नागपूर येथे आहे.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील जैव वैद्यकीय घनकचरा उचलण्याच्या कामाबाबत**

**(५) २८१९८ (२७-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील काही शासकीय रुग्णालयातील जैव वैद्यकीय घनकचरा उचलण्याचे चंपावती वेस्ट मॅनेजमेंट, बीड यांच्याकडील वेस्टेज मॅनेजमेंट काम कुठलीही पुर्व सुचना न देता काढून दुसऱ्या कंपनीला दिल्यामुळे झालेल्या तक्रारीची गंभीर दखल घेऊन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने जिल्हा शल्यचिकित्सकाना कारणे दाखवा नोटीस दिल्याचे दिनांक ०९ जुलै, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी वेस्टेज मॅनेजमेंटचे काम कुठलीही पूर्व सुचना न देता काढून दुसऱ्या कंपनीला देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे. मे.चंपावती वेस्ट मॅनेजमेंट, बीड यांची सेवा बंद करुन दि.०१.०४.२०१५ पासून मे.अक्षय इंडस्ट्रीज, लातूर या संस्थेस काम सोपविण्यात आल्यामुळे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेमार्फत जिल्हा शल्यचिकित्सक, उस्मानाबाद यांना दि.२२.०६.२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली होती.
(२) मे.चंपावती वेस्ट मॅनेजमेंट बीड यांचेमार्फत जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद येथील जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट वेळेत व नियमित होत नसल्याची तक्रार प्राप्त झाल्यामुळे, तसेच सदर संस्थेशी केलेला करार दि. ३१ मार्च, २०१५ रोजी संपल्यामुळे सदरचे काम दि.०१.०४.२०१५ ते दि.३१.०७.२०१५ या कालावधीकरीता मे.अक्षय इंडस्ट्रिज, लातूर या संस्थेला देण्यात आले होते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती वन वृत्त अंतर्गत अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरिता सरळ सेवा वनरक्षक भरतीबाबत अपंग दर्शवून त्यांची नियुक्ती रद्द केल्याबाबत**

**(६) २८९०३ (१३-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती वन वृत्त अंतर्गत अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरिता सरळ सेवा वनरक्षक भरती सन २०१४ अन्वये पात्र कुमारी सुमन बेठेकर राहणार ढाकणा पोस्ट बिजू

धावडी यांना अपंग नसतानाही अपंग दर्शवून त्यांची नियुक्ती रद्द केल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी शासनाकडे सदर प्रकरणी चौकशी करून कुमारी बेठेकर यांना सेवेत सामावून घेण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याबाबत दोषी अधिकारी यांचेवर शासन कोणती कारवाई करणार आहे,
(४) असल्यास, शासन चुकीची दुरुस्ती करून कु. बेठेकर यांनी किती कालावधीत शासन सेवेत सामावून घेणार आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०७-२०१६) :** (१) व (२) होय, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजीशासनाकडे सदर प्रकरणी चौकशी करुन कुमारी बेठेकर यांना सेवेत सामावून घेण्याची मागणी केली आहे हे खरे आहे. अमरावती वनवृत्तात वनरक्षक संवर्गासाठी भरती प्रक्रिया ऑगस्ट २०१४ मध्ये राबविण्यात आली होती. सदर भरती प्रक्रियेत कुमारी सुमन बेठेकर यांनी सहभाग घेतला होत. त्यांनी सादर केलेल्या वैद्यकीय दाखल्यानुसार त्या Visual Disability असल्याचे आढळून आल्याने भरती प्रक्रियेसाठी त्यांच्या नावाचा विचार करण्यात आला नाही. त्यामुळे कुमारी सुमन बेठेकर यांना अपंग नसतानाही अपंग दर्शवून त्यांची नियुक्ती रद्द केल्याच्या कथनात तथ्य नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संत तुकाराम हॉस्पिटल अकोला यांना शासनाकडून कर्करोग रुग्णावरील सन २०१२ पूर्वीपासूनची उपचारांची रक्कम थकीत असल्याबाबत**

**(७) २८९१२ (२१-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत संत तुकाराम हॉस्पिटल अकोला यांना शासनाकडून कर्करोग रुग्णावरील सन २०१२ पूर्वीपासूनची उपचारांची रुपये २४,२३,७७७/- इतकी थकीत रक्कम तातडीने अदा करण्याबाबत दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी नागपूर हिवाळी अधिवेशन २०१४ मध्ये एका वर्षापूर्वी आश्वासन देवूनही अद्यापि रक्कम अदा करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन विदर्भातील गरीब कर्करोग रुग्णाची निशुल्क सेवा करणाऱ्या धर्मादाय रुग्णालयांना थकीत रकमेकारिता वेठीस धरणार आहे काय,
(३) नसल्यास संत तुकाराम रुग्णालय यांना सदरची थकीत रक्कम शासन किती दिवसांत अदा करणार आहे,
(४) या प्रकरणी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासन देवूनही अद्यापि रक्कम अदा करण्याबाबत कार्यवाही न केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :** (१) संत तुकाराम हॉस्पीटल, अकोला या रुग्णालयाची सन २०१२ पुर्वीची थकबाकी ही राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत नसुन जुन्या जीवनदायी आरोगय योजनेंतर्गत होती.

सदर रुग्णालयाची जुन्या जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत प्रलंबित असलेली रु. २४.२५ लक्ष एवढी रक्कम शासन निर्णय दि. २९.०३.२०१६ अन्वये संबंधित रुग्णालयास अदा करण्यात आली आहे. सद्यस्थितीत जुन्या जीवनदायी आरोग्य योजनंतर्गत सदर रुग्णालयाची कोणतीही थकबाकी प्रलंबित नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(८) २९०७६ (२१-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील ग्रामस्थांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्याकरिता शासन कोणती कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-०७-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील पनहाळा तालुक्यात ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित असून मंजूर असलेली सर्व १२ पदे नियमित स्वरुपात भरलेली आहेत व त्यांच्यामार्फत रुग्णांना रुग्णसेवा पुरविण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हा स्त्री रुग्णालयाचे विस्तारीकरण करण्याबाबत**

**(९) २९२२१ (२१-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद येथे ६० खाटाची क्षमता असलेल्या जिल्हा स्त्री रुग्णालयात अंदाजे ११० महिला प्रसूतीसाठी दाखल झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्या मंजूर खाटाच्या क्षमतेनुसार वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची मंजूर पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढीव खाटांच्या आवश्यकतेनुसार रुग्णालयाचे विस्तारीकरण व वैद्यकीय कर्मचारी वर्गाच्या पूर्ततेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे,
(४) अद्याप उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

उस्मानाबाद येथील स्त्री रुग्णालयात माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये ७५२ महिला रुग्ण दाखल झाल्या असून ४९७ इतक्या महिलांची प्रसूती झाली आाहे.
(२) व (३) हे खरे आहे.

या रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मंजूर ७१ पदांपैकी ४५ पदे भरलेली असून २६ पदे रिक्त आहेत. याकरीता जिल्हा रुग्णालयातील वर्ग-३/वर्ग-४ चे कर्मचारी प्रतिनियुक्तीवर घेण्यात आले आहेत. गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही अनुक्रमे उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर व जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद यांच्या स्तरावर सुरु आहे. दि.१७.१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर बृहत आराखड्यानंतर प्राप्त होण्याऱ्या राज्यातील आरोग्य संस्था स्थापनेच्या/ श्रेणीवर्धनाच्या प्रस्तावांच्या एकत्रित धोरणात्मक निर्णयाची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. यामध्ये उस्मानाबाद येथील ६० खाटांच्या स्त्री रुग्णालयाचे १०० खाटांच्या स्त्री रुग्णालयात श्रेणीवर्धनाच्य प्रस्तावाचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथे सततच्या बदलत्या वातावरणामुळे थंडी, ताप, सर्दी, घसा खवखवणे इ.आजारांच्या साथीबाबत**

**(१०) ३०३०५ (२१-०१-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे सततच्या बदलत्या वातावरणामुळे थंडी, ताप, सर्दी, घसा खवखवणे इ.आजारांसाठी साथ आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या साथीवर नियंत्रण मिळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देगलूर व बिलोली (जि.नांदेड) येथील १०० खाटांच्या रुग्णालयाचा बृहत आराखड्यामध्ये समावेश करणेबाबत

**(११) ३२२३२ (२१-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) येथील १०० खाटांच्या रुग्णालयाचा बृहत आराखड्यामध्ये समावेश करणेबाबत मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) अद्यापपर्यत यासंदर्भात कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानूसार दि.१७.०१.२०१३ व दि.०९.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यात १३६८ आरोग्य संस्था स्थापन/श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या आरोग्य संस्था १००% कार्यान्वित होण्यापूर्वीच स्थानिक लोकप्रतिनिधी/जनतेकडून नव्याने आरोग्य संस्था स्थापना/श्रेणीवर्धनाच्या निवेदने प्राप्त होत आहेत. या अनुषंगाने एकत्रित धोरणात्मक निर्णयाची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. यामध्ये बिलोली येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात व देगलूर येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याची बाब समाविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबतच

**(१२) ३२८४७ (२१-०१-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील रुग्णालयामध्ये सुमारे ११०० डॉक्टरांची रिक्त पदे भरण्यासाठी (माहे सप्टेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात) आरोग्य खात्यातर्फे मुंबईतल्या आरोग्य भवनात सलग तीन दिवस मुलाखती घेण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डॉक्टर हे ग्रामीण भागातील रुग्णालयात काम करण्यास तयार आहेत, परंतु अद्याप त्यांना नियुक्तीपत्रे दिले नसल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियुक्तीबाबत राज्य शासनाच्या कडून दिशाभूल होत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०५-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ग्रामीण भागातील रुग्णालयामध्ये २८७ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी निवड मंडळामार्फत पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांचे दिनांक १४ ते १६ सप्टेंबर, २०१६ दरम्यान समुपदेशन घेण्यात आले होते.
(२) होय.

मात्र समुपदेशनादरम्यान नियुक्ती स्विकारण्यास संमती दर्शविलेल्या २३६ विशेषज्ञ आणि ४६६ एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांना त्यांनी संमती दर्शविलेल्या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावर नियुक्तीचे आदेश अनुक्रमे दिनांक १.१०.२०१५ आणि १८.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुडाळ तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) रुग्णालयास जागा उपलब्ध असतांनाही रुग्णालयाचे बांधकामास सुरुवात न केल्याबाबत

**(१३) ३५२६४ (२१-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडाळ तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) असलेल्या १०० खाटांच्या महिला १ रुग्णालय बांधण्याच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयास जागा उपलब्ध असतांनाही अदयापी रुग्णालयाचे बांधकामास सुरवात न होण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, महिला रुग्णालय बांधून कार्यान्वित व्हावी अशी कुडाळवासियांच्या मागणीच्या अनुषंगाने कुडाळचे लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, यांच्याकडे निवेदनाद्वारे व तद् नंतर यासंदर्भात प्रत्यक्ष भेटून मागणी केलेली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने अदयापी कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

दि.१७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या ओरोस मुख्यालयी १०० खाटांचे स्त्री रुग्णालय, स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या रुग्णालयाच्या बांधकामाच्या रु.१४.०० कोटी इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास दि.०८.०७.२०१३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यानुसार सन २०१५-१६ या वर्षी रु.६००.०० लक्ष इतक्या निधीची अर्थसंकल्पीय तरतूद करुन देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत या रुग्णालयाच्या तळमजल्याचे स्लॅब लेव्हल पर्यतच काम पूर्ण झालेले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कामगार सेवेसाठी अवघी १५ रुग्णालये कामगारांना सेवेसाठी उपलब्ध असल्याबाबत**

**(१४) ३६२७७ (२१-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे ऑगस्ट, २०१५ अखेर अंदाजे २५ लाख कामगारांची कर्मचारी राज्य विमा नियम या योजनेत नोंदणी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतांना राज्यात मात्र अवघी १५ रुग्णालये कामगारांना सेवेसाठी उपलब्ध आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) राज्यात कामगारांच्या संख्येत वाढ झाली तथापि रुग्णालयाच्या संख्येत वाढ झाली नसल्याने अनेक कामगारांना या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) राज्यातील अनेक रुग्णालयाच्या इमारती अत्यंत जीर्ण झाल्या असून त्या मोडकळीस आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्या दुरुस्त करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत राज्यात राज्य कामगार विमा योजने अंतर्गत कुण २३,५१,८६० नोंदणीकृत विमाधारक असुन सुमारे ९८ लाख लाभार्थी आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत नोंदणीकृत विमाधारक व लाभार्थीना राज्य शासनामार्फत वैद्यकीय सेवा पुरविण्याबाबत येते.

ज्या ठिकाणी २५ कि.मी. च्या आत राकावियो रुग्णालये नाही त्या ठिकाणी राकावि महामंडळामार्फत Secondary Medical Care करिता खाजगी रुग्णालयांशी टाय-अप करण्यात येते. सद्यस्थितीत राकावि महामंडळामार्फत एकूण १० खाजगी रुगणालयाशी टाय-अप करण्यात आले असून सन १५-१६ मध्ये एकूण ३४९१ विमारुग्णांना या खाजगी रुगणालयांमार्फत उपचार पुरविण्यात आले आहेत.

याव्यतिरिक्त राकावि महामंडळामार्फत विमारुग्णांना Super Speciality Medical Care करिता एकूण १४ खाजगी रुग्णालयांशी टाय-अप करण्यात आले असून सन २०१५-१६ मध्ये एकूण ८५७४ विमारुग्णांना या खाजगी रुग्णालयांमार्फत अतिविशिष्ट उपचार पुरविण्यात आले आहे.

(४) व (५) हे अंशत: खरे आहे.

राकावि महामंडळ नवि दिल्ली यांच्या मालकीचे उर्वरित १२ रुग्णालयांची विशेष दुरुस्तींची कामे वेळोवेळी राकावि महामंडळामार्फत करण्यात येतात. राकावि योजना राज्य कार्यकारी समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार २५ वर्षापेक्षा जास्त जुन्या असलेल्या रुग्णालयाचे Structural Audit करुन घेण्यास मान्यता देण्यात आली असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

राकावि योजनेअंतर्गत १५ राकावियो रुग्णालयापैकी वरळी, मुलुंड व नागपूर हे ३ रुग्णालये राज्य शासनाच्या मालकीचे असून उर्वरित १२ रुग्णालये राकावि महामंडळ केंद्र शासन यांच्या मालकीचे आहेत. शासनाच्या मालकीच्या ३ रुग्णालयांपैकी मुलुंड व नागपूर रुग्णालयाच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यानुषंगाने राकावियो रुग्णालय मुलुंड व नागपूर येथील विशेष दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेण्यात येत आहे.

राज्य कामगार विमा महामंडळामार्फत बुटीबोरी नागपूर येथे १०० खाटांचे रुग्णालय सुरु करण्यात निर्णय घेण्यात आला आहे.

---

**नागपूर शहरातील औद्योगिक क्षेत्रातील कामगार रुग्णालयाबाबत**

**(१५) ३६४२६ (२१-०१-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात औद्योगिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कामगारांकरिता कामगार रुग्णालय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात सुमारे १ लक्ष कामगार असून दवाखाना अपूऱ्या सोयी सुविधा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दवाखान्यात डॉक्टर व इतर कर्मचारीची संख्या अपूरी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उपचाराकरिता लागणारे यंत्र सर्व प्रकारची सामुग्री येथे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा कोणत्या उपाययोजना केल्या आहेत

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०३-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

नागपूर शहरातील औद्योगिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कामगारांकरिता सोमवारीपेठ नागपूर येथे राकावियो रुग्णालय कार्यरत आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

नागपूर विभागात १,५९,२८० नोंदणीकृत विमाधारक असून सुमारे ६ लाख लाभार्थी आहेत. या सर्वांना राकावियो नागपूर मर्फत विशेषज्ञ बाह्य व आंतररुग्ण उपचार पुरविण्यात येत असून सदर रुग्णालयामार्फत सन २०१५-१६ मध्ये ७९,३३६ बाह्यरुग्ण व २४,७५४ आंतररुग्णांना उपचार देण्यात आले असून ७२२ लघु व ४१४ मोठ्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

सदर रुग्णालयात कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे सदर रुग्णालयात पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत. तथापि पर्यायी व्यवस्था करुन विमारुग्णांना उपचार पुरविण्यात येतात.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयात विशेषज्ञ व वैद्यकीय अधिकारी या संवर्गाची अनुक्रमे १३ व १९ पदे मंजरू असून त्यापैकी अनुक्रमे ७ व १४ पदे भरलेली तर ६ व ५ पदे रिक्त आहेत. तसेच परिचारीका व समवैद्यकीय संवर्गात अनुक्रमे ५५ व ३३ पदे मंजुर असून त्यापैकी अनुक्रमे ४४ व १२ पदे भरलेली तर ११ व २१ पदे रिक्त आहेत.

तथापि रिक्त पदांमुळे सेवेत अडथळा होऊ नये याकरिता वेळोवेळी राकावि महामंडळामार्फत अंशकालीन विशेषज्ञांची १ वर्षाकरिता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत असून शासनामार्फत बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांची नियुक्ती करण्यात येते. सदर रुग्णालयात सद्यस्थितीत राकावि महामंडळामार्फत ५ अंशकालीन विशेषज्ञांची नियुक्ती करण्यात आली असून शासनामार्फत ६ बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी व ३३ बंधपत्रीत परिचारीकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) व (५) हे अंशत: खरे आहे.

तथापि सदर रुग्णालयाकरिता आवश्यक त्या ठिकाणी नवीन वैद्यकीय उपकरणे व यंत्रे खरेदी करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर रुग्णालयाकरिता नवीन क्ष किरण यंत्र व संगणकीय रेडीओग्राफी प्रणाली हे वैद्यकीय यंत्र खरेदी करण्यात येऊन कार्यन्वित करण्यात आली आहेत. तसेच सदर रुग्णालयाकरिता राकावियो राज्य कार्यकारी समिती च्या दि.२९.०३.२०१६ रोजी संपन्न झालेल्या पाचच्या बैठकित इतर १२ वैद्यकिय उपकरणे व यंत्रे खरेदीसाठी मान्यता देण्यात आली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय देवरुख व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वर्ग १ ते ४ मधील रिक्त पदे भरणेबाबत**

**(१६) ३६४९३ (२१-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय देवरुख व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वर्ग १ ते ४ मधील पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्यामुळे रुग्णांच्या उपचारांमध्ये विलंब होत असून सार्वजनिक आरोग्यासारख्या अत्यावश्यक सेवेवर त्याचा परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ जुलै, २०१५ रोजी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री व राज्यमंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
ग्रामीण रुग्णालय, देवरुख येथे गट-अ ते गट-ड ची २७ पदे मंजूर आहे. त्यापैकी २२ पदे भरलेली असून ५ पदे रिक्त आहेत. तसेच आरोग्य विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य विभागाची गट-अ ते गट-ड ची १७४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १५८ भरलेली असून १६ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) गट-अ ते गट-ड रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे तर गट-क व ड ची पदे भरण्याची कार्यवाही विभागीय स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा रुग्णालयातील अपुऱ्या सुविधांबाबत**

**(१७) ३६६४६ (२१-०१-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा रुग्णालयावर तीस - पस्तीस लाखांची लोकसंख्या असून शहराबरोबरच नाशिकच्या खेडोपाड्यापासुन ते सीमेला लागून असलेल्या अन्य जिल्ह्यात प्रसुतीच्या सगळ्या सुविधा उपलब्ध असतानाही रुग्ण जिल्हा रुग्णालयात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात अन्य वैद्यकीय सेवातील समस्यांबरोबरच प्रसुती विभागातील केवळ ३० खाटांच्या व्यवस्थेमुळे तीन-तरन मातांना एकाच खाटेवर आपल्या नवजात बालकासोबत गुदमरावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जागेचा अभाव, अपुऱ्या कर्मचारी वर्गावर येणारा कामाचा ताण, सुविधांची कमतरता अशा परिस्थितीत प्रसुती कक्ष रुग्णांना सेवा देत असल्याने नवजात बालक व त्यांच्या मातांना प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा रुग्णालयातील प्रसुती कक्षातील जागा वाढवून खाटांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) नाशिक येथे २०० खाटांच्या स्त्री रुग्णालयास मान्यता व त्यानुसार पदनिर्मितीच्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**पाटण (जि.सातारा) येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालय करण्यास मान्यता मिळणेबाबत**

**(१८) ३६८४५ (१६-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) या तालुक्याच्या ठिकाणी सुमारे ७० ते ८० गांवाकरीता राज्य शासनाने ग्रामीण रुग्णालय उभारले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयात या विभागातील सुमारे ७० ते ८० गावातील व वाडया वस्त्यांमधील रुग्ण औषधोपचाराकरिता येत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या कमतरतेमुळे रुग्णालयात औषधोपचाराकरीता येणाऱ्या रुग्णांनी मोठी गैरसोय होत असल्याने या ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालय असा दर्जा देवून त्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी संख्या वाढविणेबाबतचा प्रस्ताव ग्रामीण रुग्णालयाने जिल्हा रुग्णालयाच्या मार्फत राज्य शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने यासंदर्भात कोणता निर्णय घेतला आहे,

(५) अद्यापही यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची व पाटण ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देवून मान्यता न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) पाटण, जि.सातारा येथील ग्रामीण रुग्णालयाकरीता आकृतीबंधानुसार मंजूर वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या २७ पदांपैकी २३ पदे भरलेली असून ४ पदे रिक्त आहेत. तथापि, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या कमतरतेमुळे रुग्णांची गैरसोय झाल्याचे आढळून आलेले नाही.

तथापि, मा.लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनूसार पाटण, जि.सातरा येथील ग्रामीण रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाचा प्रस्ताव दि.४.०५.२०१६ रोजी शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा व भडगाव (जि.जळगाव) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याची मागणी**

**(१९) ३८३५१ (२१-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा व भडगाव (जि.जळगाव) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याची मागणी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनतर्फे करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरूप काय आहे,
(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर मागणी संदर्भात क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजीव गांधी जीवनदायी योजनेत ९७२ आजारांचा समावेश करण्याबाबत**

**(२०) ३८६९५ (१६-०१-२०१६). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजीव गांधी जीवनदायी योजनेत ९७२ आजारांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आजरांच्या उपचारासंदर्भात पुरेशी स्पष्टता नसल्यामुळे अनेक रुग्णांना या योजनेचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेअंतर्गत ह्दय शस्त्रक्रियेसाठी मदतीची तरतुद आहे मात्र शस्त्रक्रियेपूर्वी व नंतरच्या उपचारांसाठी कोणत्याही मदतीची तरतुद नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, अनेक त्रुटींमुळे गरीब रुग्णांची हॉस्पीटलकडून पिळवणूक होत आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, या योजनेतील त्रुटी दूर करुन ही योजना पुर्णपणे नव्या स्वरुपात लागु करण्यासंदर्भात शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या पहिल्या टप्प्यात एकुण ९७२ उपचार पध्दतींच्या समावेश होता. तथापि दि.१६.११.२०१३ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियामक परिषदेच्या तिसऱ्या बैठकीत पहिल्या टप्प्यातील ९७२ उपचार पध्दतीपैंकी २ वगळून (गैर वापराची शंका असल्यामुळे) एका नवीन उपचार पध्दतीचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार स.स्थिती राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या पहिल्या व दुस-या टप्प्यत एकुण ९७१ उपचार पध्दतींचा समावेश आहे.
(२) नाही, योजनेंतर्गत दि. २ जुलै, २०१२ ते दि.३१ मे, २०१६ अखेर एकुण ८,८६,८२३ उपचार/शस्त्रक्रिया झालेल्या आहेत.
(३) नाही.
(४) नाही.
(५) विद्यमान योजनेतील त्रुटी दुर करुन सुधारीत योजना दि.२१.११.२०१६ पासून राबविण्यासंदर्भात प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राजीव गांधी जीवनदायी योजनेंचा लाभ मध्यम वर्गीय घेत असल्याबाबत**

**(२१) ४०६५१ (१०-०५-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी योजनेचे मुंबईसह आठ जिल्ह्यातील प्रथम सन २०१२ मध्ये सुरुवात झाल्यानंतर सन २०१३ मध्ये राज्यात या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, आता पर्यंत नेमका किती रुग्णांना कसा लाभ मिळाला याची पाहणी टाटा सामाजिक सौमित्र घोष आणि मेंगलोर येथील हेडगे वैदकीय संथेच्या प्रियांका रेंट यांनी तपासणी करून दिनांक १४ नोव्हेंबर, २०१५ रोजी सेज ओपन जनरलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार या योजनेंचा लाभ मध्यम वर्गीयांनी घेतल्याचे निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, त्यांनी या योजनेतील त्रुटीवर प्रकाश टाकून हि योजना सुधारणेबाबत मत प्रदर्शन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आले आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे सहाय्यक प्रा.सौमित्र घोष व राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीतील तत्कालीन प्रशिक्षणार्थी प्रियंका डिसूझा यांनी दि. २ जुलै, २०१२ ते दि.१ जुलै, २०१३ या कालावधीत मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील योचजनेच्या पहिल्या टप्प्यातील १५२ रुग्णांचा अभ्यास करुन त्याचा पाहणी अहवाल तयार केला होता.

सदर अहवाल पहिल्या टप्यतील केवळ आठ रुग्णालयांतील १५२ रुग्णांवर आधारीत असून मुंबई व मुंबई उपनगर पुरता मर्यादित आहे. संपुर्ण महाराष्ट्रात ही योजना व्दितीय टप्यात कार्यान्वित झाली असून योजनेतील त्रुटींवर योग्य उपाय योजले जात असल्याने सदरचे मत निदर्शक नाही.

(४) योजनेंतर्गत प्राप्त तक्रारींचे जीवनदायी आरोग्य सोसायटीकडून वेळोवेळी निराकरण करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोर्लीपंचतन (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देणेबाबत**

**(२२) ४०८५५ (१०-०५-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोर्लीपंचतन (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथे रायगड जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र गेल्या ५० वर्षापासून कार्यरत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वाढती लोकसंख्या, परिसरात वाढलेल्या पर्यटकांचे संख्या वा दिघी पोर्टचा विस्तार याचा विचार करता येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा द्यावा अशी मागणी येथील परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय?

(३) असल्यास, ग्रामस्थाच्या मागणीचा शासन सहानुभूतीपूर्वक विचार करून ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र बोर्लीपंचतन हे सन १९८९ पासून सुरु आहे.

(२) होय.

(३) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल.

---

**किनवट (जि.नांदेड) येथील उपवनसंरक्षक कार्यालयाच्या प्रलंबित प्रस्तावाबाबत**

**(२३) ४१५०१ (०७-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) येथील उपवनसंरक्षक कार्यालयास मंजूरी मिळाली असून केवळ तरतुदीकरिता सदरचा प्रस्ताव शासनाकडे गेल्या आठ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयात सर्वाधिक वनक्षेत्र किनवट, माहूर तालुक्यात असले तरी उपवनसंरक्षक कार्यालय १५० कि.मी अंतरावर नांदेडला असल्यामुळे किनवटला उपवनसंरक्षक कार्यालय व्हावे ही मागणी तालुक्यातील जनतेची केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उपवनसंरक्षक कार्यालयाच्या प्रलंबित प्रस्तावास तातडीने मंजूरी देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) किनवट येथे उपवनसंरक्षक कार्यालय व्हावे ही मागणी मराठवाडा जनता विकास परिषद, औरंगाबाद, तालुका शाखा किनवट, जि.नांदेड यांनी केली आहे.

(३) व (४) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यातील मधुमेह आणि उच्च रक्त दाबाच्या रुग्णांना स्वाईन फ्लू प्रतिबंधक लसीपासून दूर रहावे लागत असल्याबाबत**

**(२४) ४२३८९ (१०-०५-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मधुमेह आणि उच्च रक्त दाबाच्या रुग्णांना स्वाईन फ्लू प्रतिबंधक लसीपासून दूर रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ७६ केंद्रामधून अवघ्या ७५० रुग्णांपर्यंत ही लस पोहचली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही लस या रुग्णांपर्यंत पोहचविण्यासाठी शासनाने जनजागृतीचे मोहीम हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

२० जुलै, २०१५ ते ३१ जानेवारी, २०१६ अखेर राज्यात १०२ लसीकरण केंद्रे कार्यरत होती व त्या लसीकरण केद्रांवर मधुमेह आणि उच्च रक्त दाबाच्या १८१२ रुग्णांना लसीकरण केले आहे.

(३) २० जुलै, २०१५ रोजी मा.मंत्री (आरोग्य) यांच्या हस्ते ऐच्छिक व मोफत फ्ल्यू लसीकरण मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले त्याचवेळी लसीकरणास लोकाचा उत्तम प्रतिसादर मिळावा याकरीता आरोग्य शिक्षण मोहिम सुरु करण्यात आली या मोहिमत खालील बाबी प्रामुख्याने करण्यात आल्या.

- इन्फ्ल्यूएंझा लसीकरण मोहिमेसंदर्भात २० हजार बॅनर्सची छपाई व वितरण.
- २५ हजार पोस्टर्सची छपाई व वितरण.
- राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये ९२ ठिकाणी होर्डींग लावण्यात आले.

- इन्फ्ल्यूएंझा लसीकरण मोहिमेसंदर्भात राज्यात प्रमुख टी.व्ही. चॅनलवर जाहिरातीचे प्रसारण.
- रेडीओ. झिंगलच्या माध्यमातून फ्ल्यू लसीकरण मोहिमेचा प्रसार.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात दुष्काळ असतांना जलसंधारण विभागातील योजनांना स्थगिती दिल्याबाबत**

**(२५) ४३६९३ (२९-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलसंधारण विभागातील योजनांना स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच जलसंधारण विभागातील योजनांची स्थगिती उठवून सदर योजनांची कामे तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :** (१) होय.

जलसंधारण विभागातील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे दिनांक १४/१०/२०१४ रोजीच्या पत्रानुसार दिनांक १/४/२०१४ पासून महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत (विदर्भ वगळून) विविध टप्प्यातील योजनांची पुढील कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली.

(२) महामंडळास दरवर्ष उपलब्ध होणाऱ्या निधीचा विचार करता, प्रगतीपथावरील कामे प्रथम पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून दिनांक १/४/२०१४ पासून महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत (विदर्भ वगळून) विविध टप्प्यातील योजनांची पुढील कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली आहे.

(३) महामंडळांतर्गत प्रगतीपथावर असलेली ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेची कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे हाती घेण्याबाबत महामंडळामार्फत पुढील पाच वर्षाचा कृती आराखडा तयार करण्याचे नियोजन आहे व त्याअनुषंगाने पुढील कामे तातडीने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात जलसंधारण योजनांना स्थगिती दिल्याबाबत**

**(२६) ४३७६५ (२९-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गतवर्षी अत्यल्प पाऊस पडल्याने राज्यात दुष्काळ पडला असता जलसंधारण योजनांच्या कामांना स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी जलसंधारण विभागातील कामांना दिलेली स्थगिती उठवून जलसंधारणाची कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :** (१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक १/४/२०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या १२०० योजना तसेच दिनांक १/४/२०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतु प्रत्यक्षात क्षेत्रिय कामे सुरु झाली नाहीत अशा सर्व योजनांना सुध्दा स्थगिती देण्यात आली आहे.

(२) राज्यातील दुष्काळग्रस्त भाग, पाणी, टंचाई, योजनेतील त्या भागातील आवश्यकता, योजनेची सद्य:स्थिती इत्यादी बाबींचा सर्वंकष विचार करुन स्थगिती देण्यात आलेल्या योजनांपैकी जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत गावातील १०१ योजनांची स्थगिती उठविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात जन्मलेल्या मुलांच्या प्रमाणात मुलींच्या जन्माचे प्रमाण सुमारे ३० टक्के टक्क्यांनी कमी झाल्याबाबत**

**(२७) ४४०२६ (०१-०५-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात जन्मलेल्या मुलांच्या प्रमाणात मुलींच्या जन्माचे प्रमाण सुमारे ३० टक्के टक्क्यांनी कमी झाल्याचे माहे एप्रिल मे २०१५ पासून माहे डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंतच्या कालावधीत झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलीच्या जन्माचे प्रमाण वाढविण्यासंदर्भात कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा आखण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यात एप्रिल २०१५ ते डिसेंबर, २०१५ जन्माच्यावेळी मुला-मुलींचे लिंग गुणोत्तर प्रमाण पुढील प्रमाणे आहे.

एप्रिल २०१५-८६३

डिसेंबर २०१५-१०३८

माहे एप्रिल २०१५ व डिसेंबर २०१५ ची आकडेवारी पाहता डिसेंबर २०१५ मध्ये लिंग गुणोत्तर प्रमाणात वाढ दिसून येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा रुग्णालय ठाणे येथे ऑडिओग्राम यंत्र उपलब्ध करुन देणेबाबत**

**(२८) ४४५१४ (१०-०५-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील जिल्हा शासकीय रुग्णालयात कर्णबधिर व्यक्ती अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत असतात, हे खरे आहे काय,

(२) सदर शासकीय रुग्णालयात कानाचे तज्ञ डॉक्टर ऑडिओग्राम यंत्र उपलब्ध नसल्याने सदरचे रुग्णांना बांद्रा येथे जंग राष्ट्रीय स्त्रवन विकलांग संस्था येथे जाण्याचा सल्ला देतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, परिणामी वयोवृध्द व इतर रुग्णांना प्रवासा दरम्यान आर्थिक, मानसिक, शारिरीक त्रास सहन करावा लागत असून उक्त प्रकरणी ऑडिओग्राम यंत्र ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपलब्ध करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे येथे माहे सप्टेंबर, २०१२ पासून यंत्र उपलब्ध होते. परंतु पदवीधारक ऑडीओलॉजीस्ट उपलब्ध नसल्यामुळे कर्णबधीर रुग्णांना फक्त ऑडिओग्राम घेण्यासाठी अलीयावर जंग बांद्रा येथे पाठविण्यात येत होते. परंतु मार्च, २०१४ पासून पदवीधारक ऑडीओलॉजीस्ट उपलब्ध असल्याने दर बुधवारी येणाऱ्या कर्णबधीर रुग्णांचे रुग्णालयातच ऑडिओमेट्री करुन अपंगत्वाचे प्रमाणपत्र त्या दिवशी देण्यात येताता. सद्यस्थितीत कोणत्याही कर्णबधीर रुग्णाला इतर कोणत्याही रुग्णालयामध्ये वा बांद्रा येथे तपासणीसाठी पाठविण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील लाखो अपंगांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याची महत्वाकांक्षी योजनेबाबत**

**(२९) ४५१२० (११-०५-२०१६). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाखो अपंगांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र नसल्याने शासकीय योजनांचा लाभ मिळू शकत नसल्यामुळे आरोग्य विभागाने आगामी दोन वर्षात दहा लाख अपगांना प्रमाणपत्र देण्याची महत्वाकांक्षी योजना हाती घेतल्याने माहे सप्टेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोहिमेमुळे हजारो अपंगांना शासकीय योजना व्यवसाय तसेच शासकीय सेवेत सामावून घेण्याचा मार्ग मोकळा होणार, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात २०११ च्या जनगणनेनुसार २१ लाख अपंगाची संख्या आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उर्वरित १९ लाख अपंगांना ही प्रमाणपत्र शासन तात्काळ देणार आहे काय,

(५) असल्यास, याबाबतचा कृती आराखडा शासन तयार करणार वा केला आहे काय,

(६) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) होय.

(२), (३), (४), (५) व (६)

आगामी दोन वर्षात १० लाख अपंगांना प्रमाणपत्र देण्याची महत्वकांक्षी योजना शासनाने हाती घेतली असून राज्यातील अपंगांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने संगणकीय प्रणालीद्वारा तातडीने प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक सेवा व साधनसामुग्री तसेच आर्थिक तरतुद याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर योजना कार्यान्वित होऊन अपंगांना त्याचा लाभ मिळणार आहे.

---

**झर्ये (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील पाझर तलावाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३०) ४५२९१ (२९-०४-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) झर्ये पाझर तलावास दिनांक २३ फेब्रुवारी,२००६ मध्ये प्रशासकिय मंजूरी देऊन त्याकरीता ५१,०३,२९१/- इतका निधी जिल्हापरिषदेकडे वर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त झर्ये पाझर तलावाकरिता प्राप्त निधीतून फक्त २० टक्केच काम पूर्ण झाले असून उर्वरित कामांकरिता जिल्हापरिषदेने सुधारित अंदाजपत्रक तयार करुन शासनास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त झर्ये पाझर तलावाच्या कामाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार सुधारित अंदाजपत्रकास शासनाने मंजूरी देऊन सदर निधी जिल्हापरिषदेकडे वर्ग करण्यात आला आहे काय,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
दिनांक २४/३/२००६ रोजी प्रशासकीय मंजूरी दिली आहे.
(२) उक्त झर्ये पाझर तलावाकरिता प्राप्त निधीतून ६५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामांकरिता जिल्हा परिषदेने सुधारित अंदाजपत्रक तयार करुन शासनास सादर केले आहे.
(३) प्रस्तावाची छाननी करुन त्रुटींची पुर्तता जिल्हा परिषदेकडून करण्यासाठी कळविण्यात आले आहे.
(४) दिनांक २६/५/२०१६ रोजी सचिव (जलसंधारण) यांनी बैठक घेवून संबंधितांना मार्गदर्शन केले व तशा पध्दतीचा प्रस्ताव तात्काळ सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात हवामानाच्या बदलामुळे साथीच्या आजारांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याबाबत**

**(३१) ४५५३२ (११-०५-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात हवामानाच्या बदलामुळे साथीच्या आजारांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याने नाशिक येथील सिव्हील हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात डॉक्टर व कर्मचा-यांची अपुरी संख्या असल्याने रुग्णालयामध्ये येणा-या रुग्णांना वेळेवर उपचार होत नसल्याने नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासाठी कोणत्या तातडीने उपाययोजना केल्या आहेत वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
मागील तीन वर्षाची तुलनात्मक साथरोग परिस्थिती पाहता या वर्षी साथरोगामध्ये वाढ झालेली आढळून आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सद्यस्थितीत नाशिक जिल्हा रुग्णालयात डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांची संख्या पुरेशी आहे. तथापि, रिक्तपदे भरण्याकरीता उचित कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच साथरोग नियंत्रणाकरीता दैनंदिन सर्वेक्षण, मोफत निदान व उपचार व्यवस्था, पुरेसा औषण पुरवठा, आरोग्य शिक्षण आदी उपाययोजना करण्यात येत आहेत. तसे, उपलब्ध कर्मचारी वर्गाकडून रुग्णांना वेळेवर उपचार करण्यात येत आहेत.

---

**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतून ॲजिओग्राफी व एमआरआय पुर्णत: मोफत करण्याचा प्रस्ताव**

**(३२) ४६३७६ (११-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतून ॲजिओग्राफी व एमआरआय पुर्णत: मोफत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) व (२) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत ज्या उपचार पध्दतींच्या निदानाकरीता ॲजिओग्राफी व एमआरआय या चाचण्यांची आवश्यकता असते, त्या उपचार पध्दतींच्या पॅकेज मध्येच या चाचण्यांच्या खर्चाचा अंतर्भात असतो. रुग्णाला सदर योजनेंतर्गत संपूर्णपणे मोफत उपचार दिले जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय कार्यक्रम असलेल्या बरबडा प्राथमिक आरोग्य केंद्रात (जि.नांदेड ) नियोजनाची शस्त्रक्रिया करण्यासाठी आलेल्या महिलांना डॉक्टरांनी मारहाण केल्याची घटना**

**(३३) ४६६५६ (११-०५-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कार्यक्रम असलेल्या बरबडा प्राथमिक आरोग्य केंद्रात (जि.नांदेड) नियोजनाची शस्त्रक्रिया करण्यासाठी आलेल्या महिलांना शस्त्रक्रिया गृहात भुल देऊन डॉ.बहात्तरे व डॉ.पी.के भिसे यांनी उध्दटपणाने बाळंतीण महिलांना मारहाण केल्याची खळबळजनक घटना नुकतीच माहे नोव्हे-डिसेंबर,२०१५ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र बरबडा, जि.नांदेड, येथे ऑक्टोबर २०१५ मध्ये आयोजित केलेल्या कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबीरामधील घटना आहे.

(२) होय.

(३) प्राथमिक चौकशी अहवालानुसार डॉ.डब्ल्यू.एन.बहात्रे, तालुका आरोग्य अधिकारी, बिलोली व डॉ.पी.के.भिसे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बरबडा तालुका नायगाव, जि.नांदेड यांना शासन आदेश दि.७ एप्रिल, २०१६ च्या आदेशानुसार निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील मोखाडा जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधा-यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(३४) ४७०७५ (०६-०५-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील मोखाडा जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाने केलेल्या पाटबंधाऱ्यांची कामे निकृष्ट दर्जाची असल्याने श्री. रवींद्र साळवे यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने सर्व कामांची उप अभियंता, लघु पाटबंधारे उपविभाग, जव्हार यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये सर्व कामे तांत्रिकदृष्टया योग्य असून ती सुस्थितीत आहेत. सव बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा निर्माण झालेला आहे. त्यामुळे तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही.

संबंधीत तक्रारदाराने सदर तक्रार गैरसमजूतीतून केली गेली असल्याचे दिनांक १५/२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना लेखी स्वरुपात कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाकण आणि आळंदी (ता.खेड, जि.पुणे) या दोन्ही ग्रामीण रुग्णालयात डायलेसीसची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३५) ४७३६३ (११-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण आणि आळंदी (ता.खेड, जि.पुणे) या दोन्ही ग्रामीण रुग्णालयात डायलेसीसची सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णांची गैरसोय होत असल्याने डायलेसीसची सुविधा रुग्णालयात उपलब्ध होणेकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ यास दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने रुग्णालयात सुविधा उपलब्ध करून देणेबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :** (१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्रामीण रुग्णालय चाकण व आळंदी या रुग्णालयात डायलेसिस मशिन बसविण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांना दि.१५.१२.२०१५ अन्वये निवेदनाद्वारे मागणी केली आहे.
(३) ग्रामीण रुग्णालय हे ३० खाटांचे रुग्णालय असून या रुग्णालयात डायलेसिस युनिटसाठी पुरेशी जागा व बांधकाम तसेच मनुष्यबळ उपलब्ध नसते त्यामुळे ग्रामीण रुगणालयात डायलेसिस सुविधा अनुज्ञेय नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## किन्नर सर्व समाज विकास संस्थेने मा. मुख्यमंत्र्यांना आपल्या मागण्यांसदर्भात दिलेले निवेदन

**(३६) ४८२५७ (२८-०४-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किन्नर सर्व समाज विकास संस्थेने विविध मागण्यांसाठी नागपूर विधानभवनावर मोर्चा काढून आपल्या मागण्यांचे निवेदन मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने तृतीयपंथीयासंदर्भात दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी शासनाने करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०७-२०१६) :** (१) नाही, याबाबत मा.मुख्यमंत्री कार्यालयातील संगणक प्रणालीवर निवेदन प्राप्त झाल्याचा शोध घेतला असता निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) शासन निर्णय क्र. तृतीपं-२०१४/प्र.क्र.४९/का-९ दिनांक ०६.०९.२०१४ अन्वये राज्यातील तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशांने तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेले आहे. तसेच याबाबत आवश्यक असलेली कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**परभणी येथे नवीन महिलांसाठी रुग्णालय उभारण्याबाबत**

**(३७) ४८४०६ (११-०५-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथे महिलांसाठी नवीन रुग्णालय उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने महिलांसाठी नवीन रुग्णालय उभारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.

शासन निर्णय दि.१७.०१.२०१३ अन्वये परभणी येथील ६० खाटांचे स्त्री रुग्णालयास १०० खाटांचे स्त्री रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर १०० खाटांच्या एम.सी.एच.विंग महिला रुग्णालयाच्या परभणी येथील बांधकामास दि.१८.०१.२०१६ रोजी आयुक्त, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने भारत सरकारकडून (GOI) प्राप्त मंजूर नकाशानुसार अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही उपअभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पश्चिम घाटाच्या सुरक्षा व शाश्वत विकासासंबंधी डॉ.गाडगीळ समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३८) ४९८०९ (०७-०२-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जैवविविधतेने समृध्द असलेल्या व देशाच्या हवामानावर मोठा परिणाम करणाऱ्या पश्चिम घाटास जागतिक वारसा स्थळ असून पश्चिम घाटाच्या सुरक्षेसंबंधित व

शाश्वत विकास संबंधी डॉ.गाडगीळ समितीने केलेल्या शिफारशींची स्विकृत करुन त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे काय,

(२) असल्यास, भागातील बॉक्साईट खाणीबाबत टप्प्या टप्प्याने बंद करण्यासाठीची कार्यवाही करण्यात येत आहे काय,

(३) असल्यास, या भागाच्या शाश्वत विकासासाठी पर्यटनास चालना देऊन खाणी मोठे उद्योग नागरी वस्त्याच्या वाढी रोखण्यासंबंधी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे वा आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०६-२०१६) :** (१) पश्चिम घाटातील पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याचे दृष्टीने केंद्र शासनाकडून सन २०१० मध्ये डॉ.माधव गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती.सदर समितीने २०१२ मध्ये केंद्र शासनाला अहवाल सादर केला आहे या अहवालातील त्रुटी तसेच आक्षेपाचा अभ्यास करण्याकरीता केंद्र शासनाने डॉ. कस्तुरीरंगन यांचे अध्यक्षतेखालील २०१२ मध्ये High Level Working Group (HLWG) गठीत करण्यात आला. सदर कार्यगटाला पश्चिम घाट परि-संवेदनशील क्षेत्र घोषीत करण्यासाठी अहवाल तयार करणेस सूचित करण्यात आले. डॉ. के.कस्तुरीरंगन समितीने २०१३ मध्ये अहवाल तयार करुन केंद्र शासनाला सादर केला आहे. केंद्र शासनाने दिनांक १६.११.२०१३ चे ज्ञापनाद्वारे डॉ. के.कस्तुरीरंगन समितीचे अहवालाला तत्वत: मान्यता दिली. तथापि डॉ.के.कस्तुरीरंगन समितीचे अहवालातील प्रस्तावित परि-संवेदनशील क्षेत्राची राज्य शासनाद्वारे प्रत्यक्ष क्षेत्र व सीमा पडताळणी करण्यासाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला निर्देशीत केले त्यानुसार राज्य शासनाने डॉ. के.कस्तुरीरंगन अहवालातील पश्चिम घाट परि-संवेदनशील क्षेत्राची सीमा व क्षेत्रा पडताळणीचे कामे ग्रामस्तरीय समिती व तालुका स्तरीय समितीमार्फत करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य शासनामार्फत अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

(२) दिनांक ०४.०९.२०१५ रोजी केंद्र शासनाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या राजपत्रातील मसुदा अधिसूचनेन्वये खाणीवर पूर्णत: बंदी राहील व चालू असलेल्या खाणी पुढील ५ वर्षात टप्या-टप्याने बंद केल्या जातील, असे प्रस्तावित आहे. अंतिम अधिसूचना प्रसिध्द झालेली नाही.

(३) केंद्र शासनाच्या दिनांक १६.११.२०१३ च्या ज्ञापनातील तरतूदीनुसार पश्चिम घाट परि-संवेदनशील क्षेत्रातील खाणी, मोठे उद्योग आणि नागरी वस्त्यांची वाढ रोखण्यासंबंधी कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे जिल्यात वैद्यकिय अपंग दाखले मिळविण्यासाठी

**(३९) ४९८५१ (११-०५-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्यात वैद्यकिय अपंग दाखले मिळविण्यासाठी जिल्हा व शहरातील अपंगांना मोठ्या यातना सहन कराव्या लागत असून दूर अंतरावरुन येणाऱ्या अपंगांना अनेकदा

पुण्यातील ससून रुग्णालय व सामान्य रुग्णालय, औध, पुणे येथे रुग्णालयाच्या दारात उपासमारीत पदपथावर मुक्काम करावा लागत असल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपंगांना वेळेत वैद्यकीय दाखले व सेवा, सुविधा-जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या ठिकाणी देणेकामी शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) नाही.

राज्यात दि. ३.१२.२०१२ पासुन अपंग प्रमाणपत्रे संगणकीय प्रणालीद्वारा देण्यास सुरुवात झाली असून पुणे जिल्ह्यात सद्यस्थितीत जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे येथून बुधवारी व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथून बुधवार व गुरुवार असे दोन दिवस अपंग रुग्णांना त्याच दिवशी अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यात येताता.
(२) पुणे जिल्ह्यातील रुग्णांना तालुक्याच्या ठिकाणी अपंगाचे प्रमाणपत्र वितरीत करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय मंचर, बारामती या रुग्णालयास अपंगांना संगणकीय प्रणालीद्वारा प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी महाऑनलाईन कंपनीस लॉग-इन आय.डी. उपलब्ध करुन देण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर लॉग-इन आय.डी. प्राप्त होताच, या रुग्णालयांकडून अपंगत्वाचे प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर (जिल्हा लातूर) उपजिल्हा रुग्णालयातील अतिरिक्त १०० खाटांच्या मंजुरी बाबत**

**(४०) ५०११३ (११-०५-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जिल्हा लातूर) उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांची संख्या लक्षात घेत माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये अतिरिक्त १०० खाटांची मंजुरी शासनाने दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये त्रुटी पूर्ण करून, राज्य शासनाने सुधारित प्रस्ताव मागवला होता, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन अतिरिक्त १०० खाटांची ची मंजुरी देणार आहे काय,
(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
शासन निर्णय दि.२.०२.२००९ अन्वये मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत उदगीर, जि.लातूर येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन विशेष कक्षासह २०० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कामगार विमा योजनेची एकूण १३ रुग्णालये व ६९ दवाखाने नियमित सुरु करण्याबाबत**

**(४१) ५०१६३ (०७-०५-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कामगार विमा योजनेची एकूण १३ रुग्णालये व ६९ दवाखाने असून ही योजना केंद्र शासनाच्या विमा महामंडळाच्या माध्यमातून चालविण्याचा निर्णय सन २०१० मध्ये घेण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत पाच वर्षापासून अद्यापपर्यंत केंद्रशासनाने सदर रुग्णांलये ताब्यात घेतलेली नाहीत, तसेच केंद्र व राज्य शासन रुग्णालयांच्या विकास व व्यवस्थापनाबाबत उदासिन राहिल्याने त्याचा रुग्णांवर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने स्वतंत्र महामंडळ स्थापन करुन सदर रुग्णालये व दवाखाने चालविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

राकावि योजनेवर राज्य शासन व राकावि महामंडळ नवी दिल्ली, श्रम मंत्रालय भारत सरकार असे दुहेरी नियंत्रण असल्याने राकावि योजना अधिक सुलभतेने राबविता यावी याकरिता राकावि महामंडळाने जी राज्ये इच्छुक असतील अशा राज्यांकडून राकावि योजना ताब्यात घेण्याबाबत सन २००६ साली प्रस्तावित केले होते. त्याअनुषंगाने राज्य मंत्री मंडळाने सन २०१० मध्ये संपूर्ण राकावि योजना राकावि महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याबाबत निर्णय घेतला होता.

(२) हे खरे आहे.

राकावि योजनेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकिय सेवेतील सुधारणाबाबत नविन धोरणात्मक निर्णय होऊ शकले नाही. त्यामुळे रिक्त पदे भरणे, नविन वैद्यकीय उपकरणे व यंत्र सामुग्री उपलब्ध करणे, नविन क्षेत्रात विस्तार, रुग्णालयीन इमारतीची देखभाल, इत्यादी बाबी प्रलंबित राहिल्या व परिणामी वैद्यकीय सेवा प्रभाविपणे पुरविण्यात अडचण निर्माण झाली.

(३) महाराष्ट्र राज्याकरिता राज्यस्तरीय राकावि महामंडळ स्थापित करण्याबाबतचा निर्णय दि. ३१.५.२०१६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाने घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**राजूरा येथील (जि. चंद्रपूर) सामाजिक वनीकरण विभाग चंद्रपूरच्या परिक्षेत्र राजूरा येथील लागवड अधिकारी कार्यालयात दारुची पार्टी चालत असल्याचा प्रकार**

**(४२) ५०२१६ (२९-०४-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा येथील (जि. चंद्रपूर) सामाजिक वनीकरण विभाग चंद्रपूरच्या परिक्षेत्र राजूरा येथील लागवड अधिकारी कार्यालयात दारुची पार्टी चालत असल्याचा प्रकार दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यामारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०७-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) श्री.एस.पी.पाटस्कर, लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण राजूरा यांनी कार्यलयात शासकीय कर्तव्यावर असताना मद्य प्रशासन केल्याचे आढळून आले. त्यांना दि ३.२.२०१६ पासून शासकीय सेवेतून निलंबित केले असून त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी (जि.बीड) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत**

**(४३) ५१५३५ (११-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे सातत्याने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने आष्टी येथे तातडीने उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) मा.लोकप्रतिनिधींच्या मागणीनूसार आष्टी, जि.बीड येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धनाचा प्रस्ताव तपासून सादर करण्याबाबत दि.०२.०३.२०१६ रोजी सूचीत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सोनके (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याबाबत**

**(४४) ५२०४५ (११-०५-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सोनके (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) पासून १० किमी अंतरावर असलेल्या यात्रेच्या वाटेवर आरोग्य उपकेंद्र मंजूर झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच्या बांधकामासाठी ग्रामस्थांनी आरोग्य विभागाला जागा उपलब्ध करून दिली आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य उपकेंद्राच्या बांधकामासाठी सोलापूर जिल्हा आरोग्य विभागाने शासनाकडे निधीची मागणी केली आहे काय,

(४) असल्यास निधी केव्हा उपलब्ध करून देण्यात येईल ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) मौजे सोनके (ता.पंढरपुर, जि.सोलापूर) येथे आरोग्य उपकेंद्र मंजूर झाले आहे ही बाब खरी आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) सन २०१६-१७ चा वार्षिक प्रकल्प आराखडा मंजूर झाल्यानंतर याबाबत निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

---

**बीड जिल्हा रुग्णालयास वाढीव २०० खाटांच्या इमारतीसाठी जागा उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(४५) ५२६५१ (११-०५-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा रुग्णालयास वाढीव २०० खाटांना मंजूरी मिळून १ वर्ष होत असून यासाठी लागणारी जागा अद्याप उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाढीव २०० खाटांसाठी नवीन इमारत बांधण्यासाठी ९ हजार चौरस मिटर जागेची गरज असतांना राज्याच्या गृह विभागाकडून दोन हजार चौरस जागा उपलब्ध करुन देणे बाबत प्रस्ताव, या अपुऱ्या जागेमुळे २०० खाटांची इमारत पूर्ण होऊ शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २०० खाटांच्या नवीन इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) या रुग्णालयानजीकच्या गृह विभागाच्या उपलबध ७१८० चौ.मी. जागेपैकी त्या विभागाची प्रस्तावित बांधकामे वगळता २६६४ चौ.मी. इतकी जागा रुग्णालयाच्या

बांधकामासाठी देणे शक्य असल्याचे अभिप्राय पोलीस अधिक्षक, बीड यांनी गृह विभागास सादर केले आहे. या जागेत रुग्णालयाचे बांधकाम शक्य नसल्याने अन्य पर्यायी जागा उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंठा तालुक्यात (जि.जालना) येथील २३ अंगणवाड्यांना इमारती नाहीत तर ४६ अंगणवाड्यांचे काम अर्धवट स्थितीत असल्याबाबत**

**(४६) ५२६६४ (३०-०४-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा तालुक्यात (जि.जालना) येथील २३ अंगणवाड्यांना इमारती नाहीत तर ४६ अंगणवाड्यांचे काम अर्धवट स्थितीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच तालुक्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी व दोन पर्यवेक्षिका ही पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
मंठा तालुक्यात (जि.जालना) येथील अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती नसल्या तरी सदर अंगणवाड्या जिल्हा परिषद अखत्यारीतील शाळच्या जागेत, समाजमंदिर तसेच भाडोत्री जागत भरविण्यात येतात. अर्धवट स्थितीत १२ कामे ई.निविदा अभावी सुरु झालेली नाहीत. अंगणवाडी इमारत बांधकाम पुर्ण करुन घेण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(२) होय.
(३) व (४) तालुक्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. पर्यवेक्षिकांची पदे भरणेबाबतचे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. तथापि सदर पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात येऊन कामकाज चालविण्यात येत आहे.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव वन प्रकल्प विभागात वन मजूरांना सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(४७) ५२६९४ (०७-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव वन प्रकल्प विभागात वन मजूर म्हणून सन १९९० मध्ये कामावर घेतलेल्या कामगारांना सन १९९५ मध्ये रोजगार हमीच्या कामावर पाठविण्यात आले असून या विरोधात वनमजूरांनी न्यायालयात दाद मागीतली असता मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुन्हा त्यांना सन १९९६ पासून सेवेत सामावून घेऊन सन २००१ पर्यंत कामावर ठेवण्यात आले परंतू असे असताना त्यांची सेवा कायम करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वन कामगारांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०७-२०१६) :** (१), (२) व (३) बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील एफडीसीएम लि. नागपूर यांचे अधिनस्त खामगांव वन प्रकल्प विभाग/उपविभाग अंतर्गत पर्यायी वनीकरण नर्सरी व लागवड क्षेत्राचे संरक्षणाचे कामावर मजुर म्हणून १९९० व त्यानुसारास कामावर हंगामी मजुर म्हणून काही मजुरांना घेण्यात आले होते. १ मार्च, १९९५ रोजी या मजुरांना नोटीस देण्यात आले होती. या कामाकरीता निधी उपलब्ध नसल्यामुळे ३१.०३.१९९५ नंतर या कामगारांना कामावरुन कमी करण्यात येईल, असे सूचित करण्यात आले होते. या नोटीसी विरोधात एकूण ८ मजूरांनी कामगार न्यायालय अकोला येथे ULP क्र.१३९/१९९५ दाखल केले. सदर मजूरांना पर्याय म्हणून रोजगार हमी योजनेचे कामावर पाठविण्याची मुभा देण्यात आली होती. याप्रकरणी कामगार न्यायालय, अकोले यांनी दि.१९.०९.१९९८ रोजी सदर मजूरांना कामावर घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार त्यांना कामावर घेण्यात आले. त्यानंतर दिनांक १९.३.२००१ रोजी सहाय्यक व्यवस्थापक वनप्रकल्प, उप विभाग, खामगाव यांनी एकूण १० मजूरांना औद्योगिक विवाद कायद्यानुसार १ महिन्याची नोटीस देवून कामावरुन का बंद करण्यात येवू नये ? अशी नोटीस दिली व त्यानुसार Retrenchment Benefits देण्यात आले. या कमी केलेल्या कामगारोपैकी श्री.गुणाजी पुनाजी पावर यांनी मा.कामगार न्यायालय, अकोला येथे तक्रार दाखल केली. सदर तक्रार निरस्त करण्यात अशी. अशाच प्रकारे इतर कामगारांनीही तक्रारीदाखल केल्या. त्या सर्व तक्रारी निरस्त करण्यात आल्या. सुमारे ५३ तक्रारी करण्यात आल्या त्यापैकी ५२ तक्रारी खारीज किंवा नाकारण्यात आल्या. अपिल प्रकरणे न्यायालयात सुरु आहेत. शासन निर्णय दिनांक १६.१०.२०१२ अन्वये वन विभाग, सामाजिक वनीकरण व वन विकास महामंडळातील मजूरांना नियमित करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार वन विकास महामंडळाच्या बाबीत १,००६ पदे निर्माण करावयाची आहे. ज्या मजूरांना रितसर क्षतीपूर्ती देवून कमी करण्यात आले. त्यांना कामावर घेता येणार नाही. त्यानुसार २००१ पर्यंत तसेच योजना/योजनेत्त कामावर असलेल्या मजूरापैकी रितसर क्षतीपूर्ती देवून कायमस्वरुपी बंद करण्यात आले. तसेच, ज्या मजूरांना या

विरुध्द कामगार न्यायालयात तक्रार दाखल केली होती, त्यांच्या तक्रारी निरस्त करण्यात आली किंवा प्रकरण कोर्टात प्रलंबित आहेत. या कारणास्तव अशा मजूरांच्या सेवा दिनांक १६.१०.२०१२ नुसार कायम करण्यात आल्या नाहीत.

---

**पुणे जिल्ह्यात स्वाईन फ्ल्यू, एचआयव्ही बरोबरच क्षयरोगाचे रुग्ण वाढल्याबाबत**

**(४८) ५२७३० (११-०५-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात स्वाईन फ्ल्यू, एचआयव्ही बरोबरच क्षयरोगामुळे (टीबी) मृत्यू होणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसागणिक वाढत असल्याचे माहे डिसेंबर २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात उघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ९५ हजार पेक्षा अधिक जणांना क्षयरोग झाला असल्याचे वास्तव समोर आले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील क्षयरोग रुग्ण वाढण्याची सर्व साधारण कारणे काय आहेत यावर कुठली उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(५) सदर तपशील उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) पुणे जिल्ह्यात क्षयरोगामुळे माहे डिसेंबर, २०१३ अखेर ५२२ क्षयरुग्ण मृत्यू पावले. माहे डिसेंबर, २०१४ अखेर ४५० क्षयरुग्ण मृत्यू पावले आणि माहे डिसेंबर, २०१५ अखरे ४२३ क्षयरुग्ण मृत्यू पावले, हे खरे आहे.

वरील आकडेवारी पाहता, पुणे जिल्ह्यात क्षयरोगामुळे मृत्यू होणाऱ्या रुग्णांची संख्या कमी झाल्याचे दिसून येते.

(२) राज्यात सन २०१३ मध्ये १,३७,३२० क्षयरुग्ण, सन २०१४ मध्ये १,३५,४६५ क्षयरुग्ण आणि सन २०१५ मध्ये १,३०,९१० क्षयरुग्ण आढळून आले आहे. सदरील आकडेवारीवरुन फक्त क्षय रुग्णांच्या संख्येत घट होत असल्याचे दिसून येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समुद्रपूर (जि.वर्धा) सिमेलगत असलेल्या वानरपुवा ते मोहगाव जोडणाऱ्या जंगल रस्त्याची निर्मिती करण्याबाबत**

**(४९) ५३१६९ (०७-०५-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रपूर (जि.वर्धा) सिमेलगत असलेल्या वानरपुवा ते मोहगाव जोडणाऱ्या जंगल रस्त्याची निर्मिती करण्याबाबत ग्रामस्थांनी शासनाकडे मागणी केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोहगाव ते वानरचुवा रत्याची निर्मिती करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०७-२०१६) :** (१), (२) व (३) मोहगाव ते वानरपुवा रस्त्याकरीता ग्रामस्थ तसेच इतर यंत्रणेकडून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनजमिन वळतीकरणासाठी प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. तथापि, समुद्रपूर परिक्षेत्रात कार्य आयोजनाप्रमाणे शिवनफळ ते ताडगांव-२० कि.मी., ताडगाव ते जामकोल्ही-६ कि.मी. असे एकूण ३२ कि.मी. चे वनरस्ते अस्तित्वात आहेत.

---

**आकोट तालुक्यातील ताजनापूर येथे होत असलेला साठवण तलावाच्या कामला होणाऱ्या विलंबाबाबत**

**(५०) ५३१७२ (२९-०४-२०१६). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट तालुक्यातील ताजनापूर येथे होत असलेला साठवण तलावाचे काम रखडल्याचे निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या साठवण तलावासाठी १८ कोटी रुपये खर्च येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मात्र या तलावाच्या भुसंपादनासाठीच १३ कोटी रुपये खर्च येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, साठवण तलावाच्या कामाला भुसंपदानासाठी निधीची कमतरतेमुळे विलंब होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, हा साठवण तलाव जनहिताच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असल्याने हा तलाव पूर्णत्वास नेण्यासाठी शासन काय उपाययोजना करीत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :** (१), (२), (३) व (४) होय.
(५) सदर काम भूसंपदानामुळे आजपर्यंत होवू शकले नाही. जिल्हाधिकारी, अकोला तथा अध्यक्ष, जलयुक्त शिवार अभियान समिती, अकोला यांनी आकोट येथील आढावा सभेत दिनांक ६/५/२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यकारी अभियंता, लघु सिंचन जिल्हा परिषद, अकोला यांनी दिनांक ६/५/२०१६ रोजी या प्रकल्पाची अंदाजपत्रके चालु दराने अद्यावत करण्यासाठी लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, अकोला यांना दिलेली असून त्यावरील पुढील कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.